# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरूवार, दिनांक २५ जून, २०२६

## (सकाळी ११-०० ते ११-४५ वाजता)

**लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१) ते (३)] –**

**(१)** **श्री. पंकज भुजबळ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनेक गावांचा समावेश असून मोठ्या प्रमाणावर भाजीपाला, फळबाग, फुलशेती व विविध कृषी उत्पादन घेतले जात असणे, मात्र शहर परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्याधुनिक कृषीमाल विक्री केंद्र उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना आपला कृषीमाल विक्रीसाठी मुंबईसह इतर शहरांमध्ये न्यावा लागत असणे, त्यामुळे वाहतूक खर्च वाढणे, वेळेचा अपव्यय होणे तसेच शीतगृह सुविधा नसल्याने कृषीमालाची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत असून शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असणे, नाशिकमध्ये कृषीमाल विक्री केंद्र उभारण्याची मागणी अनेक वेळा शेतकऱ्यांकडून करण्यात आलेली असणे, शेतकरी, व्यापारी व ग्राहक यांना एकाच ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अत्याधुनिक शीतगृहासह बहुउद्देशीय शेतकरी-व्यापारी-ग्राहक मार्केट उभारणे अत्यंत आवश्यक असणे, सदर प्रकल्पामुळे शेतमालाला स्थानिक स्तरावर योग्य बाजारपेठ उपलब्ध होऊन कृषीमालाची नासाडी कमी होण्यास मदत होईल व ग्राहकांना ताजा व दर्जेदार कृषीमाल सहज उपलब्ध होणार असणे, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात अत्याधुनिक शीतगृहासह बहुउद्देशीय शेतकरी-व्यापारी-ग्राहक मार्केट उभारण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी वा त्यासुमारास शासनास पत्रव्यवहार केला असणे मात्र शासनाकडून दिरंगाई व टाळाटाळ होत असणे, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२)** **ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे जिल्ह्यातील बारवी धरणातील जलसाठा अवघ्या ३५ टक्क्यांवर आल्याने माहे एप्रिल, २०२६ दरम्यान जिल्ह्यात तीव्र पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले असल्याचे निदर्शनास येणे, वाढते तापमान, औद्योगिक व नागरी क्षेत्रातील वाढता पाणीवापर तसेच जलस्रोतांतील घटलेली जलपातळी यामुळे धरणसाठा झपाट्याने कमी झाल्याची बाब शासनाने सर्वेक्षणाद्वारे निश्चित केली असणे, शहापूर, मुरबाड व बदलापूर परिसरातील पाणीटंचाईग्रस्त नागरिकांना सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असणे, उपलब्ध पाणी साठ्याचे नियोजन, पाणी कपातीचे नियंत्रण व औद्योगिक नागरी वापराचे संतुलन राखण्यासाठी शासनाने तातडीची धोरणात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, जलसंधारण, जलपुनर्वापर, नवीन जलस्रोत निर्मिती व एकात्मिक जलव्यवस्थापनासाठी दीर्घकालीन उपाययोजना करून पाणीटंचाई निवारण करावे व नागरिकांना दिलासा देण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री सुनिल शिंदे, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर डहाणू तालुक्यातील धानिवरी येथे दिनांक १८ मे, २०२६ रोजी साखरपुड्यासाठी निघालेल्या वऱ्हाडाचा ट्रक आणि कंटेरनमध्ये झालेल्या भीषण अपघातात १३ जणांचा मृत्यू आणि २५ जण जखमी झाले असणे, अपघातग्रस्त ट्रकमधून जवळपास ६० वऱ्हाड्यांची खुलेआम सुरू असलेली अवैध वाहतूक, तत्पूर्वी कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर रायते पुलावर सिमेंट मिक्सर आणि प्रवासी व्हॅन यांच्यात भीषण टक्कर होऊन व्हॅनचालकासह ११ जणांचा मृत्यू झाला असल्याची दुर्घटना दिनांक १३ एप्रिल, २०२६ रोजी घडली असणे, या भीषण अपघातात चक्काचूर झालेल्या व्हॅनचा पत्रा कापून प्रवाशांचे मृतदेह बाहेर काढावे लागणे, मृतांमध्ये तीन सख्ख्या भावंडांचा समावेश असणे, या अपघातांमुळे ऐरणीवर आलेला अवैध वाहतुकीचा मुद्दा, राज्यातील विविध मार्गावरील मुदतबाह्य वाहनांमधून क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची होत असलेली वाहतूक हा कायमच असलेला चिंतेचा विषय, विशेषत: ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतुकीच्या अपुऱ्या सोयीसुविधांमुळे सामान्य नागरिकांना घ्यावा लागत असलेला अवैध प्रवासी वाहतुकीचा आसरा, याबाबत असंख्य तक्रारी येत असतानाही कारवाई करण्याकडे प्रशासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या अपघातात निष्पाप प्रवाशांचे जात

असलेले नाहक बळी, यास्तव राज्यातील विविध मार्गावर सुरू असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(१) **सर्वश्री अमित गोरखे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे व पिंपरी-चिंचवड शहारातील हडपसर, दापोडी व फुगेवाडी भागात बेकायदेशीररीत्या मुंबईहून 'मिथेनॉल' रासायनिक द्रव मागवून, ते उरुळी कांचन येथील अड्ड्यावर हातभट्टी दारूमध्ये मिसळल्याने व विषारी दारु प्यायल्यामुळे १९ हून अधिक नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान घडणे, यामध्ये दोन सख्ख्या भावांचा एकाच दिवशी बळी जाऊन या घटनेमुळे अनेक कुटुंबांतील कमावते पुरुष दगावल्याने गरीब कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती असणे, या प्रकरणात कर्तव्यात कसूर करणाऱ्या २ अधिकाऱ्यांसह ९ पोलिसांना निलंबित करून राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे तपास वर्ग करण्यात आला असणे, या तपासासाठी एकूण १० विशेष पथके तैनात करण्यात येणे, विषारी दारु बनविण्यासाठी मुख्य घटक असलेल्या मिथेनॉलचा पुरवठा करणारे दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरु असणे, तसेच अवैध दारू उत्पादन, साठवण व विक्री करणाऱ्या टोळ्यांवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, या प्रकरणामुळे गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड वाढून महिला व मुलींची सुरक्षा

धोक्यात येणे, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत पोलीसांकडून सतत कारवाईचे दावे केले जात असतानाही प्रत्यक्षात मात्र कारवाईचा केवळ देखावा असणे, राज्यातील मद्य नियंत्रण यंत्रणेतील गंभीर त्रुटी उघड झाल्या असणे, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उत्पादन शुल्क विभाग, पोलीस प्रशासन व स्थानिक यंत्रणांमध्ये समन्वय वाढविण्याबाबत शासनाने ठोस पावले उचलण्याची आवश्यकता व या विषारी दारूमुळे अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत मिळण्याबाबत आणि मुख्य दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून ठोस कारवाई करणे, मिथेनॉलच्या वाहतुकीवर कडक नियंत्रण आणण्यासाठी तसेच राज्यातील सर्व देशी दारु दुकानांचे व उत्पादन युनिट्सचे तातडीने पुनरावलोकन करुन रासायनिक तपासणी अनिवार्य करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. विक्रांत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"माहे जून, २०२६ च्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील सिडको डम्पिंग ग्राउंडची बेजबाबदार हाताळणी व अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे घोट गाव येथे विषबाधेमुळे सात गायी दगावल्याची अत्यंत गंभीर घटना घडणे, गावातील सुमारे ४० गुरांपैकी १९ जनावरांमध्ये विषबाधेची लक्षणे आढळून येणे, मृत जनावरांमध्ये गर्भवती गायींचाही समावेश असल्याची माहिती समोर येणे, या घटनेमुळे पशुपालक व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, संबंधित परिसरातील पाण्याच्या नमुन्यांच्या तपासणीत TDS, COD व BOD हे घटक निर्धारित मर्यादेपेक्षा अनेक पटींनी अधिक आढळणे तसेच E-Coli व Total Coliform जीवाणूंची उपस्थिती निदर्शनास येणे, त्यामुळे जलस्रोत गंभीररीत्या दूषित झाल्याचा संशय बळावणे, जनावरांचा मृत्यू होऊनही शवविच्छेदन न झाल्याने मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट न होणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व संबंधित यंत्रणांकडून प्रभावी कारवाई झालेली दिसून न येणे, या पार्श्वभूमीवर सदर घटनेची उच्चस्तरीय चौकशी करणे, दूषित पाण्याचा स्रोत शोधणे, गाईंचा मृत्यू होऊनही घटना दाबून टाकण्यासाठी ज्यांनी दबाव आणला अशांवर कारवाई करणे, जबाबदारांवर कठोर कारवाई करणे, मृत जनावरांच्या मालकांना नुकसान-भरपाई देणे तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्रातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच तुकड्यांना सन २००० च्या दरम्यान कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळालेली असणे, त्यावर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदान मिळण्यासाठी जवळपास १५ ते २० वर्षे सतत संघर्ष करावा लागलेला असणे, सध्या वर्तमान स्थितीत या शाळांना २०, ४०, ६० व ८० अशा प्रमाणात अनुदान मिळत असणे, यावर नियुक्त बहुतांश शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असणे व काही सेवानिवृत्त होण्याच्या उंबरठ्यावर असणे, एवढी वर्ष सेवा करूनही १००% अनुदान नसणे, १००% अनुदान नसल्यामुळे जुनी पेन्शन योजना, एनपीएस, कुटुंब निवृत्तीवेतन सेवा उपदान असा कुठलाही लाभ मिळत नसणे, सध्या कार्यरत असलेल्या शिक्षकांना तरी भविष्यामध्ये हे लाभ मिळण्याची नितांत आवश्यकता असणे, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ व दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार या शाळा व तुकड्यांना अनुदान टप्पा मिळालेला असणे, त्यामुळे या शाळेवरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वाढीव अनुदान टप्पा मिळण्याची तीव्र प्रतीक्षा असणे, तरी सकारात्मक विचार करून या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा वाढीव टप्पा देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

(४) **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. कृपाल तुमाने, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सध्या २० डेटा सेंटर कार्यरत असून ४४ डेटा सेंटरची भर पडणार असणे, त्यापैकी २८ प्रकल्पांचे काम अंतिम टप्प्यात असणे, डेटा प्रकल्प सतत २४ तास कार्यरत ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात विजेची व सदर प्रकल्पांच्या शीतकरणासाठी पाण्याचीही मोठ्या प्रमाणात आवश्यकता, डेटा प्रकल्पांमुळे विजेच्या मागणीत होणारी वाढ, राज्याची जास्तीत-जास्त ऊर्जा निर्मिती औष्णिक प्रकल्पाद्वारे होत असल्याने वाढणारे कार्बन उत्सर्जन, दोन महिने पाऊस विलंबाने झाल्यास जल नियोजनाअभावी राज्यावर ओढवणारे जल संकट, आगामी काळात नागरी भागात उभारले जाणाऱ्या डेटासेंटरमुळे वीज व पाण्यासाठी उद्योग व समाजात होऊ घातलेला संघर्ष, राज्याचे AI धोरणात डेटासेंटर उभारल्या जाणाऱ्या भागात पायाभूत सुविधांचा विकास व त्यासाठी जबाबदार असलेल्या शासनाच्या विभागांची क्षमता वृद्धीची गरज, वीज व पाण्याचे मर्यादित स्रोत, त्यामुळे अधिक डेटा सेंटरला परवानगी देणे

हा केवळ तंत्रज्ञानाचा विषय नसून तो जलसुरक्षा, ऊर्जा सुरक्षा, बेरोजगारी व हवामान बदलांशी संबंधित सार्वजनिक धोरणाचा भाग असणे, डेटा सेंटरमुळे राज्याला आर्थिक फायदा होणार असला तरी त्यामुळे होणारी तापमान वाढ, बेरोजगारीचे संकट, जल व ऊर्जा सुरक्षेची गरज, राज्यातील नागरी भागावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी तातडीने "ग्रीन डेटा सेंटर धोरण" ठरविण्याची आवश्यकता, डेटासेंटरला परवानगी देत असताना प्रशासकीय विभागांचा समन्वय साधण्यात होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे आगामी काळात उद्योग व समाजातील संघर्ष टाळण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सहा : शासकीय विधेयके –**

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियम) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियम) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार पुढे सुरु :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२६

---

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**सात** : **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अंबादास दानवे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, सुधाकर अडबाले, मिलिंद नार्वेकर, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, धीरज लिंगाडे, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"मराठी माध्यमांच्या शाळा बंद होणे, शिक्षक मंजूरीचे निकष आरटीई कायद्या विरुध्द असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतील अनागोंदी कारभार, मुंबई महानगरपालिकेने नालेसफाई केली नसल्यामुळे पहिल्याच पावसात जनता बेजार होणे, किरकोळ महागाईचा दर माहे मे, २०२६ मध्ये ३.९३ टक्के असून त्यामध्ये वाढ होणे, अन्न धान्य महागाईचा दर ४.७८ टक्क्यापर्यंत वाढल्याचा फटका कष्टकरी व अल्प उत्पन्न गटातील लोकांना बसणे, इंधन दर वाढीमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त होणे, महागाईचा सर्वात जास्त फटका सर्वसामान्य जनता व मध्यमवर्ग नोकरदार यांना बसणे, ग्रामीण भागातील रस्त्यांचा दर्जा निकृष्ट असताना रस्त्यात मोठ मोठे खड्डे पडणे, निकृष्ट डांबरीकरणामुळे अपघाताचे प्रमाण वाढणे, रुग्णांना रुग्णालयापर्यंत नेणे कठीण होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील सेवेत कार्यरत शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले असणे, तथापि, सध्याच्या टीईटी परीक्षेचे स्वरूप शिक्षकांच्या प्रत्यक्ष अध्यापन कौशल्यांचे सर्वसमावेशक मूल्यांकन करण्यास अपुरे असल्याबाबत शिक्षक संघटना व शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांकडून सातत्याने आक्षेप नोंदविण्यात येत असणे, सध्याच्या टीईटी परीक्षेत स्मरणशक्ती, पाठांतर व वस्तुनिष्ठ प्रश्नांवर अधिक भर दिला जात असून वर्गातील अध्यापन कौशल्य, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची क्षमता,

समस्या निराकरण कौशल्ये, मुल्यमापन पद्धती, शैक्षणिक नवकल्पना व विद्यार्थीकेंद्रित अध्यापनाचा प्रभावी वापर यांचे परीक्षण होत नसणे, त्यामुळे शिक्षकांच्या व्यावसायिक पात्रतेचे मूल्यांकन केवळ एका दिवसाच्या लेखी परीक्षेच्या आधारे करणे योग्य नसल्याची भावना शिक्षकांमध्ये निर्माण झाली असणे, तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत तयार करण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकांमध्ये बदलते अभ्यासक्रम, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०, अनुभवाधारित शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण व आधुनिक अध्यापन पद्धतींचा पुरेसा समावेश होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत, परिणामी, टीईटी परीक्षा आणि प्रत्यक्ष वर्गखोलीतील अध्यापन यांच्यामध्ये दरी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत असणे, शिक्षकांच्या सेवाकालीन अनुभव, शैक्षणिक उपक्रमांमधील सहभाग, प्रशिक्षण कार्यक्रम, संशोधनवृत्ती, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न, पालक व समाजाशी समन्वय, तसेच शाळेच्या प्रगतीसाठी दिलेले योगदान यांचा शिक्षकांच्या पात्रता निर्धारणामध्ये विचार करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येत असणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांसाठी दरवर्षी ५० तासांचे सातत्यपूर्ण व्यावसायिक प्रशिक्षण (Continuous Professional Development) अनिवार्य करण्यात आले असणे, या प्रशिक्षण प्रक्रियेला टीईटी मूल्यांकनाशी सुसंगत करून व्यावसायिक क्रेडिट-आधारित पात्रता प्रणाली विकसित करण्याची आवश्यकता असणे, तसेच शिक्षक पात्रता परीक्षेच्या पुनर्रचनेसाठी शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक प्रतिनिधी, शिक्षक संघटना, संशोधन संस्था, धोरणकर्ते व संबंधित शासकीय अधिकारी यांचा समावेश असलेला राज्यस्तरीय अभ्यासगट किंवा कार्यगट स्थापन करण्याची मागणी होत असणे, याशिवाय केंद्र शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या सी-टीईटी परीक्षेमध्ये अध्यापनशास्त्रावर आधारित प्रश्नांचा समावेश असला तरी सदर परीक्षा सर्व प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध नसल्याबाबत तक्रारी असणे, विशेषतः मराठी माध्यमातील उमेदवारांच्या हितासाठी सी-टीईटी परीक्षा मराठीसह सर्व प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक असणे, उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने शिक्षक पात्रता परीक्षेच्या विद्यमान स्वरूपाचा पुनर्विचार करणे, सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी स्वतंत्र मूल्यांकन प्रणाली अथवा व्यावसायिक क्रेडिट-आधारित पात्रता प्रणाली विकसित करणे, राज्यस्तरीय कार्यगट स्थापन करणे तसेच सी-टीईटी परीक्षा मराठी भाषेत उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.**"**

(२) **सर्वश्री सतेज उर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"ठाणे शहरातील वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे शहरीकरण व वाहतूक कोंडी लक्षात घेता प्रस्तावित ठाणे रिंग मेट्रो प्रकल्पाबाबत तज्ज्ञ, नागरिक आणि वाहतूक अभ्यासकांकडून विविध आक्षेप नोंदविण्यात आले असणे, सुमारे २९ कि.मी. लांबीच्या या प्रकल्पामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात बांधकाम होणार असल्यामुळे वाहतूक कोंडी, ध्वनी व वायू प्रदूषण तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असणे, सदर प्रकल्पाबाबत अपेक्षित प्रवासी प्रतिसाद व आर्थिक व्यवहार्यता याबाबतही प्रश्न उपस्थित होत असणे, याशिवाय शहरातील रस्ते, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, बस सेवा तसेच बस स्थानक परिसरातील वाहतूक व्यवस्थापन आणि अंतर्गत संपर्क मार्गांचे बळकटीकरण केल्यास तुलनेने कमी खर्चात अधिक परिणामकारक उपाय उपलब्ध होऊ शकतील असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले असणे, त्यामुळे या प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन वस्तुनिष्ठ पुनर्विलोकन करण्याची मागणी होत असणे, त्यानुषंगाने शासनाने ठाणे रिंग मेट्रो प्रकल्पाऐवजी शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पर्यायी उपाययोजना राबविण्याबाबत करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २४ जून, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद**.**